डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
**प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ला—४१६ ५१६**
दूरध्वनी (02366) 262234 TeleFax E-mail : *adrfruitsvengurla@gmail.com*

जा.क्र. ससस/प्राफसकें/वादेक/१८७४/२०२० दिनांक : २५/०६/२०२०

प्रति,

______________,
______________,
______________.

विषय : प्राफसंकें, वेंगुर्ला या कार्यालयातील संगणकांची देखभाल, दुरूस्ती, इंटरनेट सुविधा व इतर हार्डवेअर दुरूस्ती करणेकरीता वार्षिक देखभाल करार करणेबाबत..

महोदय,

प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ला या कार्यालया अंतर्गत वेंगुर्ला येथील विविध विभागात कार्यरत असलेल्या एकूण २४ संगणकाची एका वर्षासाठी देखभाल तसेच दुरूस्ती करणेसाठी वार्षिक देखभाल करार (Annual Maintenance Contract) करण्यास इच्छूक संगणक दुरूस्तीदारांकडून वार्षिक देखभाल करणेसाठी दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

तरी वर नमूद केल्याप्रमाणे संगणक दुरूस्तीसाठी वार्षिक देखभाल करार करण्यास आपण इच्छूक असल्यास त्यासाठीचे आपले दरपत्रक निम्नस्वाक्षरीकार यांचे नांवे दिनांक १५/०७/२०२० पूर्वी/पर्यंत या कार्यालयास पोहोचेल अशा बेताने पाठवावे. दरपत्रकामध्ये अटी व शर्तीचा स्पष्ट उल्लेख करावा.

दरपत्रकाच्या लखोटयावर 'संगणक देखभाल करारासाठी दरपत्रक' असा उल्लेख असावा. विहित मुदतीच्या नंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

कृपया आपले दरपत्रक लवकरात लवकर पाठवावे ही विनंती.

आपला विश्वासू,

सहयोगी संशोधन संचालक,
प्रादेशिक फळ संशोधन केंद्र,
वेंगुर्ला, जि. सिंधुदूर्ग

**अटी व शर्ती :**

१) या कार्यालयातील विविध विभाग/शाखामध्ये असलेल्या एकूण २१ संगणकाची दुरूस्ती कार्यालयात येवून करावी लागेल. दुरूस्तीकरीता संगणक बाहेर किंवा दुरूस्ती केंद्रावर पाठविला जाणार नाही.

२) दरपत्रकावर GST क्रमांक नमूद असणे आवश्यक आहे. तथापी क्रमांक लागू नसल्यास तत्सम प्राधिकरणाकडील नोंदणी क्रमांक असलेल्या निविदाकारांच्या लेटरहेडवरील दरपत्रक सादर करावे. अशा दरपत्रकासोबत पुरवठादाराने पॅन कार्डची छायांकित प्रत सोबत जोडावी.

३) कोणतेही कारण न देता दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणे तसेच सदरील प्रक्रिया रद्दबातल ठरविणेचा अधिकार निम्नस्वाक्षरीकारांनी राखून ठेवला आहे.

४) दरपत्रकात दिलेले दर सर्व करांसहीत स्पष्टपणे नमूद करावे.

५) टपालद्वारे दरपत्रक पोहचण्यास विलंब झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.